# इंटरनेटवरील मराठी भाषा : उपयोजन आणि सर्जन

संतोष शाहू बोंगाळे,
मु. पो. पिंपळखुंटे, ता. माढा, जि. सोलापूर.
भ्रमनध्वनी-9923900840

**प्रास्ताविक :**

मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये संपर्काचे माध्यम म्हणून भाषेला महत्वपूर्ण स्थान आहे. मानव प्राणी हा भाषा वापरणारा आहे. संपर्कासाठी भाषेचाच सर्वात जास्त वापर होतो. भाषेशिवाय मानव ही कल्पनाही करवत नाही आजच्या युगात संपर्काची माध्यमे ही मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत. परस्पर संपर्काची घनता वाढून ती काळाची गरज झालेली आहे. आज विस्तारणारी ज्ञानक्षेत्रे, नवीन उद्योग - व्यवसायांची क्षेत्रे अशा एक ना अनेक क्षेत्रांमध्ये भाषा आणि भाषिक कौशल्यांना खूपच महत्व प्राप्त झाले आहे. व्यावसायिक क्षेत्रे म्हणून भाषिक कौशल्यांचा वापर होवू लागला आहे. भाषा हे मानवी संपर्काचे सर्वश्रेष्ठ साधन आहे.विविध भाषिक कौशल्यांची विविध मुद्रित माध्यमे, दूरचित्रवाणी, चित्रपट क्षेत्र, आकाशवाणी, नाटयक्षेत्र, इंटरनेट यासारख्या वाढत्या प्रसारमाध्यमांना जास्त गरज आहे. प्रसारमाध्यमे, जाहिरात, प्रशासन, विज्ञान, आरोग्य अशा अनेक ज्ञानशाखांमध्ये तसेच शिक्षण क्षेत्रातही भाषिक प्रभुत्वाला महत्व आले आहे. इंटरनेट क्षेत्रही यात मागे नाही.

**भाषिक उपयोजनाची क्षेत्रे व सर्जनशीलता :**

साहित्य व्यवहार, प्रशासन, प्रसार माध्यमे ही भाषिक उपयोजनाची विशेष आणि महत्वपूर्ण क्षेत्रे आहेत. या क्षेत्रांनी मानवी जीवन व्यापून गेले आहे. आजच्या या संगणक युगात प्रसार माध्यमे, इंटरनेट, दूरचित्रवाणी या माध्यमांनी मानवी जीवनाचा ताबा घेतला आहे. साहित्य क्षेत्रामध्ये भाषिक उपयोजनाची विविधता आढळते. प्रशासकीय भाषा व्यवहारामध्ये आपणास सर्जनतेपेक्षा प्रशासकीय भाषेवर प्रभुत्व मिळवणे आवश्यक असते. इतर क्षेत्रामध्ये सर्जकतेला खूप मोठा वाव असल्याचे दिसते. सर्जनशीलता हा भाषेचा गुण असल्याने अनेक क्षेत्रामध्ये याचा लाभ घेता येतो.

''सर्जनशीलता म्हणजे कलेमध्ये, तंत्रविज्ञानामध्ये समस्या विलक्षण पध्दतीने अगर अभिनव पध्दतीने सोडवून नवनिर्मिती करण्याची पात्रता किंवा कुवत होय. '' सर्जनशीलतेमुळेच अनेकांनी अमूल्य कामगिरी केली आहे. नवनिर्मितीमध्ये नाविन्य, रूपांतर, समुचितता हे घटक महत्वाचे असतात. नवनिर्मिती ही सर्जनशील विचारातूनच होत असते. भाषिक सर्जनशीलतेची क्षमता भाषा वापरणा-या प्रत्येक माणसाजवळ असतेच. सर्जनशीलता म्हणजे भाषेचा सौंदर्यपूर्ण, कौशल्यपूर्ण आणि परिणामकारक वापर होय. प्रभावी संपर्कासाठी, संप्रेषण करण्यासाठी भाषेला पर्याय राहत नाही. आज प्रसारमाध्यमे, दूरचित्रवाणी, आकाशवाणी, वेगवेगळया वाहिन्या, इंटरनेट या सर्व ठिकाणी भाषेचा विविधांगी आणि सर्जनशील वापर होत आहे. भाषेचा हा सर्जनशील वापरच भाषेची क्षमता अधोरेखित करतो.

**संगणक : संपर्काचे महत्वाचे माध्यम :**

मानव हा बुध्दीवान प्राणी असल्याने त्याने संगणकाचा शोध लावला. या संगणकाचा वापर आता सर्रास सर्वच क्षेत्रामध्ये होत आहे, नव्हे ती आता काळाची गरज झाली आहे. बँका, आरोग्य, शिक्षण, प्रशासन, व्यवसाय अशा नानाविध क्षेत्रामध्ये संगणक वापरला जातो. संगणकाच्या माध्यमातून केला जाणारा संवाद म्हणजे संगणक संप्रेषण व्यवहार होय. जगभरामध्ये सर्वाधिक संपर्क संगणकामार्फतच होतो. त्यामुळे हे माध्यम खूप लोकप्रिय आणि अत्यावश्यक झाले आहे. भाषा शिक्षण, भाषा व्यवहार यासाठी संगणक हे प्रभावी माध्यम आहे. संगणकामुळे मानवी कामास गती आणि शिस्त प्राप्त होते. अफाट माहितीचे संकलन व साठा करता येतो. अनेक क्षेत्रात संगणकाचा वापर संवादासाठी करण्यात येतो.

**इंटरनेटवरील भाषा उपयोजन आणि सर्जन :**

संगणकाबरोबरच इंटरनेट हा शब्द आता परवलीचा बनलेला आहे. मराठीत इंटरनेटला 'महाजाल' हा शब्द वापरला जातो. इंटरनेटमुळे जगाचे रूपांतर एका जागतिक खेडयात झाले आहे. इंटरनेटच्या एका क्लिकवर आपणास प्रचंड माहिती, मनोरंजन, संवाद अशा गोष्टी नानाविध भाषेत उपलब्ध झाल्या आहेत. इंटरनेट हे वर्ल्ड वाईड वेब या नावाने ओळखले जाते. वेबवरील विशिष्ट माहितीच्या दस्तऐवजाला 'वेब पेज' असे म्हटले जाते. अशी अब्जावधी पेजेस वेबवर पहावयास मिळतात. आपण हवे त्या वेळी सर्च इंजिनच्या साहाय्याने वेब पेजवरील माहिती उपलब्ध करून घेऊ शकतो.

आज इंटरनेटवर विविध ग्रंथ, ज्ञानकोश, शब्दार्थकोश, लेख,कथा,कविता उपलब्ध आहेत. इंटरनेटच्या साहाय्याने व्यापार, खरेदी, संवाद, देवाणघेवाण, ई - मेल, चॅटिंग, बातम्या, मनोरंजन, ब्लॉग्स या गोष्टी खूप सोप्या झाल्या आहेत. १९९० साली इंटरनेटची सुरुवात झाली आणि आज अब्जावधी संगणक इंटरनेटला जोडलेले आहेत.

इंटरनेटच्या साहाय्याने आपल्याला पुढील सेवा उपलब्ध होतात.

१. ई मेल २. व्हॉईस मेल ३. ई - कॉमर्स ४. वर्ल्ड वाईड बेब ५.युजनेट ६.गोफट ७.टेलनेट
८. ब्लॉग्स ९. सोशल नेटवर्किंग १०. विकिपिडिया

जगभरातील इंटरनेटचे जाळे, लाखो वेबसाईटस, प्रत्येक वेबसाईटवर उपयोजण्यात येणारे अनेक पर्याय यातून संवादाची निकड लक्षात येते. इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे वहन खूप मोठया प्रमाणात होते. गुगल सर्च या सर्च इंजिनवरुन हवी ती माहिती मिळते. अनेक पर्याय असलेल्या साईटच्या लिंक दिल्या जातात. विकिपिडिया सारखे मुक्त ज्ञानकोश आपल्याला माहितीच्या ज्ञानसागरात घेऊन जातात. आपले विचार व्यक्त करण्यासाठी, माहितीचे जतन करण्यासाठी, अभ्यासासाठी आणि अभिव्यक्तीसाठी संगणकाशिवाय पर्याय नाही.

संगणकाच्या बाबतीत आपणास इंटरनेटवर अभिव्यक्त होण्यासाठी, सर्जनासाठी आणि उपयोजनासाठी भाषेची लेखनकौशल्ये आत्मसात करावी लागतील. तेव्हा आपल्याला लेखन अचूक होण्यासाठी मुद्रितशोधन शिकावे लागेल. निव्वळ पुस्तकी ज्ञानावर संगणक हाताळता येणार नाही. यासाठी सर्वप्रथम या सर्व गोष्टींचा वापर करुनच शिकाव्या लागतील. यातून वाचकाला निर्मितीचा आणि आपली निर्मिती जगभर पोहचविण्याचा आनंद मिळतो. त्याच्या सर्जनाला चालना मिळत राहते.

**ई-मेल:**

ई - मेल द्वारे जगातील कोणत्याही ठिकाणी ई-संदेश पाठवणे खूपच सोपे झाले आहे. सध्या ई मेलसाठी सर्वात जास्त वापर इंटरनेटचा केला जातो. ई-मेल सेवा पुरवणा-या काही संस्था कार्यरत आहेत. याच्या साहाय्याने संदेश क्षर्णाधात जगातील कोणत्याही ठिकाणी पाठवता येतो. त्यासाठी मात्र संदेश पाठविणा-याकडे व ज्याला संदेश पाठवायचा आहे त्याच्याकडे ई - मेल आयडी असावा लागतो. तरच संदेश पाठवता येतात. ई - मेल सेवा देणारी पोर्टल पुढीलप्रमाणे सांगता येतील -

जी - मेल (gmail), , हॉट -मेल (hotmail), याहू, (yahoo), रेडिफ - मेल (rediffmail) इत्यादी. युजरने इंटरनेटवर त्या त्या पोर्टलवर आपली संपूर्ण माहिती भरुन त्याला ई - मेल आयडी मिळवता येतो. उदा. -mr_bongale@rediffmail.com म्हणजेच युजरला एक विशिष्ट नाव मिळते.

संदेशकर्ता ई - मेल करताना चित्रे, व्हिडियो, लिखित मजकूर असे अनेक प्रकारचे संदेश पाठवू शकतो. येथे सर्जनाला वाव मिळतो. आपल्या मनातील विचार, भावना, मते इतरांना लिहून आपण कळवतो तसे स्वातांय असते. इतरांपेक्षा वेगळया नवकल्पना, नवविचार जेव्हा आपण व्यक्त करत असतो तेव्हा एक प्रकारचे सर्जनच घडत असते.

**ब्लॉग्ज:**

आपले हक्काचे व्यासपिठ, आपले विचार अभिव्यक्त करुन सगळया जगाला कळविण्याचे, संपर्काचे महत्वपूर्ण माध्यम.

आपण इंटरनेटवर स्वतंत्रपणे स्वत:चे ब्लॉग तयार करुन त्याद्वारे आपले विचार, कथा, कविता, लेख, चिंतन, चुटके अशा अनेक उपयोजित माध्यमातून आपले सर्जनशील विचार व्यक्त करु शकतो. ब्लॉग्जला मराठीत 'अनुदिनी' हा शब्द वापरला जातो. १९९० च्या दशकात ऑनलाईन दैनंदिनी लिहायला सुरुवात झाली. पण १९९५ नंतर याचा सर्रासपणे वापर होवू लागला. आज इंटरनेटवर जवळ जवळ ३६ भाषेमध्ये अनुदिनी लिहण्याची सोय उपलब्ध आहे. गुगलची www.blogspot.com ही ब्लॉगसाईट खूपच उपयुक्त व प्रसिध्द आहे. www.blogear.com या संकेतस्थळावर आपले खाते उघडून आपण अनुदिनी लिहू शकतो. वेगवेगळया रचनाबंधनात आपल्याला ती तयार करता येते.

इंटरनेटवर आज मराठी भाषेत अनेक ब्लॉग्ज आहेत त्यामध्ये मराठी ब्लॉगविश्व, मुक्तायन, गप्पाष्टक, दुसरी चळवळ, मराठी नेटाक्षरी, आनंदघन, मराठीविश्व इ. युनिकोडच्या सुविधेमुळे मराठी भाषेतही व हव्या त्या आकारात ब्लॉग आकर्षकपणे व नाविन्यपूर्ण तयार करुन प्रसिध्द करता येतात.

**मराठी संकेतस्थळे :**

इंटरनेटद्वारे आपण स्वत:ची तसेच वेगवेगळया संस्थांची संकेतस्थळे तयार करून त्याद्वारे समाजापर्यंत पोहचू शकतो. अनेक शैक्षणिक संस्था, विद्यापिठे, कॉलेजेस, विज्ञानसंस्था, पर्यटन, व्यापार आदी सर्वच क्षेत्रातील मराठी संकेतस्थळे इंटरनेटवर उपलब्ध आहेत. नविन मराठी संकेतस्थळे तयार करता येतील. यातून योग्य, समर्पक भाषा उपयोजनातून समाजापर्यंत पोहचता येते. वेगवेगळया लेखकांच्या कवींच्या, साहित्यीकांच्या मराठी वेबसाईटस बनवून प्रबोधन, प्रचार व प्रसार करता येईल. नवनिर्माण केलेले साहित्य प्रकाशित करता येईल.

काही मराठी उपयुक्त संकेतस्थळे पुढीलप्रमाणे -

www.marathiworld.com, www.marathionline.com, www.erasik.com, www.govinda.com www.marathimati.com www.mymarathi.com www.marathishrushti.com अशा अनेक संकेतस्थळावरुन मराठी भाषा विविध रुपांतून अवतरताना दिसते.

**विकिपिडिया :**

विकिपिडिया म्हणजे इंटरनेटवर सदैव उपस्थित असलेला ज्ञानकोश होय. आपण या ज्ञानसागरातून आपणाला हवी ती माहिती क्षर्णाधात मिळवू शकतो व त्यात भरही घालू शकतो. उदा. - मराठी विकिपिडिया. कॉम मराठी भाषेची अथिपासून इतिपर्यंतची सर्व माहिती आपणास येथे उपलब्ध आहे. तसेच साहित्य, संस्कृती, समाज, प्रदेश, भाषा, व्यापार, भौगोलिक स्थान याविषयी मराठीतून माहिती तात्काळ उपलब्ध होते.

**ई-जर्नल:**

इंटरनेटच्या माध्यमातून आपण ई - जर्नल सुरु करू शकतो. यासाठी रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे. मराठी भाषेतील ई - जर्नलमधून आपल्या सर्जनाला वाव देवून आपले लेख, प्रतिक्रिया, मते प्रकाशित करू शकतो. यासाठी ही माध्यमे कशी वापरायची याचे कौशल्य आत्मसात करायला हवे.

**ई-जाहिराती:**

मराठी भाषेतून इंटरनेटवर हव्या तशा जाहिराती देता येतात. या माध्यमात सर्जनशीलतेचा कस लागतो. या जाहिरातीच्या मजकुराबरोबरच ध्वनी, संगीत, चित्रे यांचाही प्रभावी वापर करता येतो. ग्राफिटीतून सर्जनशील विचार व्यक्त करता येतात. उदा. -

१) कालचं स्वप्न
आणि
उद्याची संधी
यांच्यामध्ये
आजचा कंटाळा आहे ...

२. कोणतीही गोष्ट
उचलण्यापेक्षा
ढकलणं
सोपं असतं....
जबाबदारी
बाबतीत
मी तेच करतो......

**सोशल नेटवर्किंग:**

फेसबुक, ट्विटर अशा सोशल नेटवर्किंगवरून अनेक लोकांशी संपर्क साधता येतो. ताबडतोब संदेश पाठवता येतो. सुदान देशातील क्रांती, अण्णा हजारेंचे आंदोलन प्रभावी होण्यास सोशल नेटवर्किंगचा खूप मोठा हातभार लागलेला आहे. याच साईटसवरून 'एखादी ओळ देऊन' त्यावर अनेक आशयाच्या कविता करता येतात. गप्पाष्टक, चॅटिंग यातून समाजातील माणसांशी माणूस सतत संपर्कात राहू लागला आहे. समाजमन घडवायला या साईटचा खूप मोठा वाटा आहे.

**नेटिकेट्स्:**

आपण समाजामध्ये वावरत असताना जसे शिष्टाचार पाळतो तसेच शिष्टाचार इंटरनेटचा वापर करताना पाळावे लागतात त्यालाच नेटिकेट्स् म्हणतात. उदा. -

१. ई -मेल हा कधीच कॅपिटल अक्षरामध्ये असू नये कारण ते रागावल्याचे प्रतिक आहे.

२. ई -मेल छोटा, मुद्देसूद भाषेच्या चुका टाळून करावा कारण त्यावरून संदेशवाहकाची प्रतिमा ठरत असते.

३. कारण नसताना नको ते ई - मेल पाठवू नयेत.

४. ब्लॉगवर कोणाची अपमान करणारी भाषा वापरू नये.

५. गोपनियतेचा भंग करणारी धमकी देणारी माहिती प्रकाशित करू नये.

६. अश्लिल, बिभत्स माहिती व छायाचित्रे देवू नयेत.

७. समाजात दुही पेरणारी भाषा किंवा समाजात अराजक माजेल अशी काही माहिती वेबसाईटवर टाकू नये. कारण असे केल्यास 'माहिती तंत्रज्ञान कायदा २०००' आणि भारतीय दंडसंहितेनुसार दंडात्मक शिक्षा व तुरूंगवासही होवू शकतो.

**इंटरनेटमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी:**

इंटरनेटवरील ई -मराठी ग्रंथालय, मायमराठी, मराठी ऑनलाईन, मराठी मित्र, मराठी विद्यापिठ सर्व मराठी संकेतस्थळावर मराठीतच अथपासून इतिपर्यंत माहिती उपलब्ध आहे. यात मराठी भाषिकांना समाविष्ट होता येते. आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी मंडळ सिडनी, मराठी मंडळ अटलांटा, टोकियो मराठी मंडळ, ब्रिस्बेन महाराष्ट्र मंडळ, महाराष्ट्र मंडळ जपान तसेच इंग्लंड, अमेरिका, सिंगापूर येथील मराठी मंडळे सांस्कृतिक कार्यक्रमांचे उपयोजन करून मराठी भाषेच्या विकासाला हातभारच लावत आहे. आपण जगाच्या पाठीवर टिकायचे असेल तर जास्तीत जास्त मराठी भाषेतून नेटवर व्यवहार केला पाहिजे.

**इंटरनेटमुळे भाषामिश्रण व भाषाबदल:**

इंटरनेट या माध्यमामुळे आज मराठी भाषेत अनेक इंग्रजी शब्द ठाण मांडून बसले आहेत. उदा.- सेव्ह, डिलिट, कट, पेस्ट, फाईल, मॉनिटर, सर्च, इंटरनेट, जीबी, एमबी, माऊस, ब्लॉग, सर्व्हर, सीडी, हॅग, मेमरी, साईट, कॉमेंट असे शेकडो शब्द मराठीत स्थिरावले आहेत. व्याकरणाची मोडतोड होवून नवीन भाषा अस्तित्वात येत आहे. जागतिकीकरणामध्ये या क्षेत्रातील भाषा एक मुक्त क्रिडा ठरत आहे. अधिकाधिक संकेतामधून भाषा व्यक्त होत आहे. कॉमिक्स, रिमिक्स, कॉमिकची भाषा आज अस्तित्वात येत आहे. उदा.

Aaj Talktime vishyi adhik mahiti milawa
Aaplya Idea mob varun
aamchya 157785
Ya number var call kara

अशा भाषेमुळे भाषेची नवीन बेटे अस्तित्वाला येवू पाहत आहेत. या sms मध्ये अक्षरे इंग्रजी आणि अर्थ मराठीत आहे. भाषाबदल व भाषामिश्रण दिवसेंदिवस होतच आहे.

**समारोप :**

इंटरनेटच्या माध्यमातून आपण प्रस्तुत उपलब्ध सुविधाद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचू शकतो. या माध्यमांचा वापर करून समाजप्रबोधन, प्रचार व प्रसार करता येत असल्याने संप्रेषणाचे महत्वाचे माध्यम म्हणून याकडे पाहिले जात आहे. मराठी भाषेचे सर्जन आणि उपयोजन खूप मोठया प्रमाणात घडून येण्यात इंटरनेटचे साहाय्य होत आहे. सर्व समाजाला नवा विचार, नवा सिध्दांत देण्यासाठी, ताजा घडामोडी बातम्या कळविण्यासाठी इंटरनेटचा वापर होत आहे.

हे सगळे खरे असले तरी हिणकस, मूल्यहीन, अश्लिल मजकूरही अफाट प्रमाणात इंटरनेटवर असल्याने यातून समाजमन दुषित होत आहे. यास कोणतेही प्रतिबंध नसल्याने याचा गैरवापर होताना दिसतो. आदर्श सामाजिक मूल्ये यातून जोपासली जातीलच असे नाही. माणसाने या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चांगल्या माहितीचा वापर करायला हवा. मराठी भाषेचा विकास घडवण्यातही इंटरनेटचा वापर करता येत असल्याने आपण तो केला पाहिजे.

इंटरनेट या माध्यमामुळे मराठी भाषेचे सर्जन आणि उपयोजन चांगले व परिणामकारक होत असल्याचे आढळते.

**संदर्भ :**

१. संवादशास्त्र - श्रीपाद जोशी
२. सृजनात्मक लेखन - डॉ. आनंद पाटील
३. www.marathionline.com
४. www.marathimati.com
५. डायमंड सामाजिक ज्ञानकोश - डायमंड पब्लिकेशन
६. आधुनिक भाषाविज्ञान : सिध्दांत आणि उपयोजन - मिलिंद स. मालशे.
७. www.esakal.com
८. www.loksatta.com
९. santoshbongale.blogspot.com